INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

# ग्रामीण महीलांच्या सक्षमीकरणामध्ये अशासकीय संस्थाची भुमिका (NGOs)

## {विशेष संदर्भ— वर्धा जिल्हयातील हिंगणघाट तालूका (महाराष्ट!)}

**कु. प्रतिभा सुभाषराव काटकर**

(गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख) यशवंत महाविद्यालय, वर्धा

महिलांना स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव करून देण्यासाठी आज प्रत्येक क्षेत्रात पुरूषांच्या खांदयाला खांदा लावून काम करत आहेत. त्यासाठी तीच्या अंतरमनातून येणारा आत्मविश्वास, आणि धाडस हे तिला पाठबळ देत आहेत. आजही जगातील महिलांना विविध क्षेत्रात जसे की, सामाजिक, धार्मिक विधी, शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतिक अशा प्रत्येक क्षेत्रात निर्णय घेण्यास त्यांना दुय्यम स्थान दिले जाते. महिला सक्षमीकरणाची समिक्षा ही मानवाधिकाराच्या नजरेतून करण्याचे काम पंचायतराज करत आहे. नुकतेच बिजिंग मध्ये जागतिक स्तरावर संपन्न झालेले ४ थे संम्मेलनाचे घोष वाक्य होते. ''महिलांच्या दृष्टीतून जगाकडे पहा'' महिला सक्षमीकरणात सर्वात महत्वाची बाब म्हणजे तिला माणुस म्हणून जगण्याची संधी देवून तिला तिचे व्यक्तिमत्व विकसित करण्यास समाजातून प्रोत्साहन मिळावे. महिला सक्षमीकरणाचा अर्थ महिलांना भीक नको आहे. कोणाची दया नको आहे. तर त्यांना पुरूषाप्रमाणे समान संधी हवी आहे. आणि यासाठीच महिलासक्षमीकरण महत्वाचे ठरते.

महिला सक्षमीकरणाची प्रक्रीया वेगाने सुरू आहे. महिला सक्षमीकरण ही संकल्पना महिला विकासाच्या संदर्भात रूढ झाली आहे. पावलो फ्रीरे यांनी सर्व प्रथम ही संकल्पना उपयोगात आणली 'महिलांना सबला करणे आणि त्यांना समान हक्क व संधी देणे हेच यामागील तत्व आहे. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांसाठी ३३ टक्के जागा राखीव ठेवण्यासाठी ७३ वी घटना दुरूस्ती इ.स. १९९० मध्ये करण्यात आली. तसेच महाराष्ट्रामध्ये स्वंयसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून महिलांच्या विकासाला एक नवि दिशा मिळाली आहे.

**व्याख्या:—**

१. "सत्तावंचित— संधीवंचित महिलांना कोणत्याही भेदभावाशिवाय प्रगती करण्याची संधी देणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय."

२. "महिला सक्षमीकरण म्हणजे दुर्बलता नष्ट करणारी. स्त्रीच्या शरीर, मानव बुध्दीमध्ये स्वत्वाची जाणीव व स्वत: बद्दल जागरूकता निर्माण करणारी व त्या दृष्टीने स्वयंविकासासाठी प्रवृत्त करणारी एक संकल्पना होय."

३. "महिला सक्षमीकरण म्हणजे स्त्रीचे व्यक्तिमत्व एक माणुस म्हणून व्यक्ती म्हणून विकसित करणे आणि त्यांना समान संधी देणे होय."

**महिलांचे सक्षमीकरण :—**

स्त्रियांचे सबलीकरण होणे म्हणजे तिचे व्यक्तिमत्व एक माणुस म्हणून विकसित करायचे व तिला तशी संधी मिळवून दयायची. महिलांना कोणत्याही भेदभावाशिवाय प्रगती करण्याची संधी दयायला हवी. कारण, प्रत्येक वेळी ती अबला आहे तसेच तिला काळी कळत नाही. ती सक्षम नाही. पुरूषाच्या तुलनेत ती काम करण्यास सक्षम नाही. असे म्हटले जाते. तसेच विविध जातीधर्माच्या स्त्रियांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. स्त्रियांच्या अंगी असणारी सहनशक्ती, संयम या गुणामुळे तिला प्रत्येक वेळी गृहीत धरले जाते. परंतु झाशीची राणी लक्ष्मीबाई ते अमेरिकेचे राष्ट!ाध्यक्ष बराक ओबामा यांना गार्ड ऑफ ऑनर देणारी पुजा ठाकुर यांच्या उदाहरणावरून स्त्रिया किती सक्षम आहेत हेच दिसून येते. आज महिलासंदर्भात विविध विकास योजना राबवल्या जात आहे. त्यांचा विकास होण्यास प्रारंभ देखील झाला आहे. परंतु ही विकासाची वाटचाल सातत्याने टिकवावी लागेल. समाजाला स्त्रियांच्या प्रश्नासंदर्भात जागृत करणे आवश्यक आहे.

**शिक्षणाद्वारे महिलांचे सक्षमीकरण :—**

महात्मा फुले म्हणतात की, 'घरातील एक माता शिकून शहाणी झाली तर सर्व कुटूंब शहाणे होईल, सगळया स्त्रिया शिकल्या की सर्व देश जागा होईल' असा विचार करूनंच महात्मा फूले यांनी स्त्री शिक्षणाचे कार्य हाती घेतले. स्त्री शिक्षणाच्या बाबतीत भारतच नव्हे तर महाराष्ट! देखिल अग्रेसर राहीला आहे. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाचा पाया घातला.आज महाराष्ट्रात अनेक संस्था स्त्री शिक्षणासाठी काम करीत आहे. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातही महाराष्ट्रीयन स्त्रीयांचे प्रमाण वाढत आहे. ही प्रगती निश्चितच नोंद घेण्यासारखी आहे.

**महिलांचे सामाजिक योगदान :—**

ब्रिटीश सत्तेच्या स्थापनेनंतर भारतीयांना पाश्चात्य ज्ञान, संस्कृतीची ओळख झाली. प्रशासनाचा व्याप सांभाळण्यासाठी भारतीयांना तयार करण्याच्या उद्देशाने शिक्षणाची सुरूवात ब्रिटीशांनी केली. बुध्दिवाद, स्वातंत्र्य, समता यांना महत्व आले. यावर आधारित सामाजिक बदलाला प्रारंभ झाला.

महाराष्ट्रातील स्त्रीमूक्ती आंदोलनाची पहीली अग्रणी सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी खूप त्रास सहन केला. आणि त्यानंतर महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाला सुरूवात झाली.

अन्नपूर्णा विलायेत शिक्षणासाठी जाणारी पहिली महाराष्ट्रीयन महीला होती. अमेरिकेत जाऊन वैद्यकीय शास्त्रातील पदवी मिळविणारी देशातील पहीली महीला आनंदीबाई जोशी हया होत. स्त्री चळवळीचे बीजे रोवण्याचे काम सावित्रीबाई फुले यांनी रोवली. आज त्याचा वटवृक्ष झाला आहे. हे काम अल्का महाजन, मेधा पाटकर, डॉ. राणी बंग, मंदाताई आमटे ई. स्त्रीया अखंडपणे चालवत आहेत.

**आर्थिकदृष्टया महिलांचे सक्षमीकरण :–**

भारतातील बहूसंख्य स्त्रीया घरकामात गुंतलेल्या आहेत. समाजात माणूस म्हणून जगायचे असेल तर आर्थिक स्वावलंबन आवश्यक आहे. स्त्रीयांच्या आर्थिक स्थिती बाबत मार्केस म्हणतो की, ''उत्क्रांतीच्या टप्यावरून पूढे सरकतांना आणि रानटी अवस्थेतून सांस्कृतिक अवस्थेपर्यंत येतांना उत्पादन साधने विकसीत होत गेली. नंतर खाजगी मालमत्ता ही संकल्पना रूढ झाली आणि संपत्तीवरील इतर हक्क पुरूषांकडे गेले.

एन्डोल्स म्हणतो ''जस जशी संपत्ती वाढली तस तसा पुरूषांच्या कौटूंबिक आणि कुटूंब बाहेरचा दर्जा स्त्रीयांच्या तूलनेत उंचावला यातून स्त्रीच्या लेखी दूय्यम दर्जा प्राप्त झाला.

उपरोक्त संदर्भानुसार वेतना संबंधी भेदभाव, स्वयंरोजगार अर्थ सहाय्याच्या अभाव, विना वेतन काम व बेरोजगारी कुटीर उद्योगात मालकी हक्क नाही अशा अनेक कारणांमुळे स्त्रीचे आर्थिक स्थान पुरूषांपेक्षा दुय्यम राहीले असे दिसते.

महीलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन आर्थिकदृष्टया महीला सक्षमीकरण करणे हा या प्रक्रियेचा उद्देश आहे. महीलांना आर्थिक अधिकार मिळवून देणे, उत्पादन प्रक्रियेत सहभागी करून घेणे या गोष्टी केल्या तरच राष्ट!ाचा विकास होईल.

महीलांना सक्षम करूनच आपण समाज आणि राष्ट!ाला बलवान करू शकतो. महीलांचा सहभाग त्यांना संरक्षण त्यांची आर्थिक उन्नती त्यांच्या क्षमतांचे समर्थन आणि या सर्वांसाठी अनुकूल वातावरण निर्मिती करावी लागत आहे. स्त्रीयांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देणे आवश्यक आहे. २१व्या शतकातील आधुनिक समाजाने स्त्रियांकडे निखळ दृष्टीने पहायला हवे असा समाज घडविणे ही पुरूष व स्त्री दोघांची जबाबदारी आहे. समाजाने आपली मानसिकता बदलून स्त्रीयांना जगवले पाहिजे. तरच ही शिक्षित होवू शकेल. तसेच त्या माध्यमातून विकसित राष्ट! तयार होईल. कारण स्वामी विवेकानंद म्हणतात '' स्त्रियांची स्थिती सुधारल्या शिवाय जगाच्या कल्याणाची शक्यता नाही.''

''कोमल है कमजोर नही तू
शक्ती का नाम ही तेरा नारी है
सबको जिवन देणे वाली
मौत भी तूमसे हारी है''

भारत सरकारने २००१ हे वर्ष महीला सबलीकरणाचे वर्ष म्हणून घोषित केले. स्त्रियांच्या सबलीकरणासाठी राष्ट!ीय धोरण ष्जीम छंजपवदंस चवसपबल वित जीम मउचवूमतउमदज वि ूवउमदष हे २००१ मध्ये मंजूर करण्यात आले.

महीलांचे सबलीकरण म्हणजे स्त्रीयांचे आध्यात्मिक, सामाजीक, राजनैतिक, आर्थिक सामर्थ्य वाढविणे त्यामध्ये त्यांच्या स्वतःच्या क्षमतेसंबंधी त्यांचा आत्मविश्वास वाढविणे हा आहे. महीला सबलीकरणात विविध पैलूंचा विचार केला जातो. मूलभूत हक्क आणि त्यांचे रक्षण करण्यासाठी संघर्षाची क्षमता हा स्त्रीमुक्तीचा आशय सबलीकरणाची चर्चा करताना कूठेही दिसत नाही. भारतात स्त्री–पुरूष समानतावाद १९७० च्या दशकानंतर सक्रीय झाला. १९७० च्या दशकात परदेशी संस्थाकडून मिळालेल्या अनुदानामूळे स्त्रियांसाठीच्या नवीन छळे स्थापना करण्यास मदत मिळाली. भारतात 'स्वयंसहायता गट' आणि ैमसि म्उचसवलमक ॅवउमदे सारख्या स्वयंसेवी संघटनांनी स्त्रीयांच्या हक्काबाबत महत्वाची भूमिका वाढविली. भारतातील स्त्रियां आता शिक्षण, राजकारण, प्रसारमाध्यमे, कला, विज्ञान आणि तंत्रज्ञान अशा अनेक क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यामुळे महीलांचे सबलीकरण कार्यरत आहेत. त्यामुळे महीलांचे सबलीकरण व्हावे यासाठी भारत सरकार अनेक योजना राबवित आहे.

स्वातंत्र्याच्या साठीनंतर राज्यसभेत महीला आरक्षणाचे विधेयक मंजूर झाले परंतू हेच विधेयक लोकसभेत ते आडकाठी आणले जात आहे. स्त्री–पुरूष समानतेचे भाषण करणारे नेतेच महीला विधेयक मंजूर करायला विरोध करीत आहेत. स्त्री–पुरूष समानतावादाचा प्रश्न आजही तसाच आहे हा वादच महीलांच्या विकासात अडसर ठरत आहे.

त्यामुळे लोकशाहीत महीलेला हक्क आणि अधिकार देतांना तिचे सामर्थ्य वाठविले पाहीजे. तरच तिचे सबलीकरण होईल.

**महीला सक्षमी करणामध्ये शासनाची भूमिका :–**

- विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून महीला सक्षमीकरण

  १) राजीव गांधी

  २) एकात्मिक बाल संरक्षण योजना

  ३) इंदिरा गांधी मातृत्व सहकार्य योजना ई.

  ४)National Mission for the empowerment of women

  ५) उज्वला योजना

  ६) राष्ट!ीय महीला सबलीकरण योजना

  ७) जेंडर बजेट

  ८) राजीव गांधी स्कीम फॉर एमपॉवरमेंट ॲडल्टस ॲन्ड गर्ल्स

  ९) धनलक्ष्मी स्कीम

  १०) बालवधू

  ११)ब्मदजतंस ।कवचजपवद त्मेवनतबम ।हमदबल

  १२) स्वाधार स्कीम

मानव समुहात जवळपास स्त्रीजातीचा निम्मा हिस्सा आहे. स्त्रियांशी हतोत्साहित करणारे आहेत. त्यांचा जिवनस्तर उंचावण्याकडे दुर्लक्ष करण्यापासून ते त्यांचा छळ आणि अत्याचार करण्यापर्यंत अनेक प्रकार हिनत्वाची वागणूक स्त्रिजातीला मिळत राहीली आहे. हा भेदभाव दूर करून स्त्रियांच्या प्रगतीस पोषक

वातावरणांची निर्मिती आणि त्यांचे सुपालन करणे आणि लैंगिक (जेंडर इक्विलिटी) समाजाचे संतुलन साधने यासाठी पुरोगामी आणि विवेकी समाजाने बाळगलेला दृष्टीकोन आणि केलेली कृती यांचा समन्वय म्हणजे स्त्री सक्षमीकरण असे थोडक्यात म्हणता येईल.

**स्त्री सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत पुढील मुद्दे प्रामुख्याने महत्वाचे ठरतात :—**

१. लैंगिक आरोग्य

२. नैसर्गिक साधनसंपत्तीची राखणावळ

३. आर्थिक सक्षमता

४. शैक्षणिक सक्षमता

५. राजकीय सक्षमता

**एनजीओची व्याख्या— गैर सरकारी संस्था :**

१) "गैर सकारी संस्था (एनजीओ) किंवा नॉन प्रॉफिट ऑर्गनायझेशन (एनपीओ)ही एक समूइ, संस्था, नफा न ठेवणारी संस्था किंवा व्यक्ती, कार्यकर्ते, स्वैच्छिक आणि सामाजिक व्यक्तींचे ना—नफा उद्योजक आहे. एनजीओ किंवा एनपीओ सामाजिक कार्यकर्ते, समूह गट, समाज, व्यक्ती, स्वयंसेवक, नागरिक आणि सामाजिक कार्यकर्ते आणि सामाजिक कल्याण आणि सामाजिक विकासासाठी काम करणारी सामाजिक स्वयंसेवी संस्था आहे. जर एखाद्या व्यक्तीचा किंवा समाजाचा समूह सामाजिक बदलासाठी काम करायचा असेल आणि काही मुद्द्यांवर तो नोंदणी न करता स्वयंसेवी संस्था म्हणून काम करु शकेल."

२) "एक गैर—सरकारी संस्था (एनजीओ) कोणत्याही ना—नफा, स्वैच्छिक नागरिकांचा समूह आहे जो स्थानिक, राष्ट्ीय किंवा आंतरराष्ट्ीय स्तरावर आयोजित केला जातो. कार्य—केंद्रित आणि सामान्य रूची असलेल्या लोकांव्दारे चालविलेले, एनजीओ विविध सेवा आणि मानवी कार्ये करतात. सरकारकडे नागरिक चिंता आणतात, धोरणांचे समर्थन करतात तरतुदीव्दारे राजकीय कणांना प्रोत्साहित करतात. काही विशिष्ट समस्या, जसे की मानवाधिकार, पर्यावरण किंवा आरोग्य यासारख्या संघटीत असतात. ते विश्लेषण आणि कौशल्य प्रदान करतात, प्रारंभिक चेतावणी यंत्रणा म्हणून काम करतात आणि आंतरराष्ट्ीय कराराचे परिक्षण व अंमलबजावणी करण्यास मदत करतात."

महिलांच्या शसक्तीकरणासाठी गैर सरकारी संस्था महत्वपूर्ण भुमिका बजावत आहेत. महिलांची स्थिती सुधारण्यासाठी त्यांना अनेक धोरणे लागू करतात. गैर—सरकारी संस्था त्यांच्या पाठींबातून बाहेर येण्याकरीता आणि फलदायी क्रियाकलापांमध्ये सहभागी होण्यासाठी विविध पैलूंवर प्रशिक्षण देत आहेत. खासगी संस्था किंवा कोणत्याही सहभागास सहभाग घेत नसलेल्या किंवा कोणत्याही सरकारचे प्रतिनिधीत्व करतात. ते लोकांचे जिवन गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि आरोग्यापासून आरोग्य, पर्यावरण आणि दारिद्रय निर्मूलनासाठी, सरकार आणि समाजाला मदत देतात. एनजीओच्या परिचालन क्षेत्राच्या व्याप्तीमुळे प्रत्येक जीवनाच्या (पटेल, दुबे, २०१०) स्पर्श होतात.

देशभरातील इतर भागांसारख्या देशांत पसरलेल्या एनजीओच्या कार्यास अनेक क्षेत्रात आणि कार्यक्रमांमध्ये, विकास—केंद्रित उपक्रम, स्त्रिया आणि कमकुवत विभागांना सशक्त करणे, मागासलेल्या विभागांच्या हक्कांचे संरक्षण करणे, पर्यावरण संरक्षित करणे, साक्षरता पसरवणे आणि शिक्षणास शिक्षीत करणे, स्वातंत्र्यानंतर एनजीओ क्षेत्राचे योगदान प्रभावी आहे. एका अंदाजानुसार देशात १ दशलक्ष एनजीओ आहेत.

स्वैच्छिक संघटनांची संख्या आणि लोकसंख्येच्या आकारामध्ये कोणत्याही प्रकारची संघटना सांगणे कठीण आहे. उदारणार्थ, उत्तर प्रदेश आणि मध्यप्रदेशसारख्या जास्त लोकसंख्या असलेल्या राज्यांत स्वयंसेवी संस्था (गंग्रेडे,१ ९ ८७) यांची कमतरता आहे. महाराष्ट!, पश्चिम बंगाल, गुजरात आणि केरळसारख्या काही राज्यांमधील संघटनांच्या संख्येत पुढे आहेत.

**एनजीओ संघटनांचे कार्यक्रम आणि क्रियाकलापांच्या प्रकारावर आधारीत १० गटांमध्ये वर्गीकरण केले जाऊ शकते. ते आहेत;**

- आरोग्य, पोषण आणि स्वच्छता
- पर्यावरण आणि वनीकरण
- पाणी शेड आणि शेती
- सहकारी आणि पत
- महिला सशक्तीकरण
- बालविकास
- सामुदायिक विकास
- गृहनिर्माण व निवारा
- संशोधन आणि प्रशिक्षण
- व्यावसायिकता कौशल्य विकास

**एनजीओची भूमिका आणि महिला सक्षमीकरण :**

महिला सशक्तीकरण प्रोत्साहन देण्यासाठी एनजीओ महत्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. ही एजन्सी कमकुवत विभागाच्या फायद्यासाठी नागरी चेतना प्रोत्साहित करतात. लोकांना एकत्र आणतात आणि प्रभावी सुनिश्चित आणि आंतरिक आणि बाहय संशाधने वाढवतात. महिला सशक्तीकरण प्रोत्साहित करण्यासाठी एनजीओ विविध प्रकारची धोरणे वापरत आहेत. महिला सशक्तीकरणाच्या प्रोत्साहित करण्यासाठी एनजीओ विविध प्रकारची धोरणे वापरत आहेत. महिला सशक्तीकरणाच्या बाबतीत एनजीओने मोठी भूमिका बजावली आहे.

**१. स्व—मदत गटांची स्थापना :** अलिकडचया काही वर्षात अनेक स्वयंसेवी संस्था स्वयंसेवी गट तयार करीत आहेत. स्वयंसेवी संस्थांचे प्रभावी कामकाज प्रामुख्याने स्वयंसेवी संस्थांच्या सशक्त समर्पणांवर अवलंबून असते. विविध संस्था फक्त सरकारच नव्हे तर स्वयंसेवी संस्थांनी देखील मागण्यापूर्ण करण्यासाठी मजबूत आधार घेतला आहे आणि एसएचजीव्दारे महिला सक्षमीकरण क्षेत्रात आवश्यक बदल केले आहेत. दुसरीकडे, सरकारी संघटनांसाठी कठीण आहे आणि गाव पातळीवर पोहचू शकत नाही. म्हणून मोठया संख्येने स्वयंसेवी संस्थांची स्थापना केली आहे आणि इच्छूकांच्या प्रती समर्पित कामगिरी करून सरकारवर

ओझे कमी केले आहे. हे स्वयं मदत गट विविध महिला सशक्तीकरण क्रियाकलाप अंमलबजावणी करण्यासाठी चॅनेल आहेत. एनजीओ ही लोकांना संघटीत करण्यासाठी आणि स्वयंसेवी गटांची निर्मिती करण्यासाठी संभाव्य संस्था आहेत. एसएचजीच्या स्थापनेशी संबंधीत सर्व तांत्रिक बाबी सहजपणे स्वयंसेवी संस्थाव्दारे ग्रास पातळीवरील गुंतवणूकीसह सहजपणे पूर्ण केली जाऊ शकतात. सूक्ष्म–क्रेडिट तंत्रज्ञानातील प्रशिक्षित फिल्ड कर्मचारी स्वस्थ स्व–मदत गटाच्या निर्मितीसाठी सर्व प्रक्रियांचे पालन करण्यास सक्षम आहेत आणि त्यांचे योग्य कार्य सुनिश्चित करू शकतात. अशाप्रकारे स्वयंसेवी गटांच्या स्थापनेत एनजीओ मोठी भूमिका बजावतात.

**२. स्व–मदत गटांची देखभाल करणे:** एसएचजीच्या निर्मितीपेक्षा एसएचजीचे पोषण करणे जास्त कठीण काम आहे. एसएचजीच्या कामकाजाशी संबंधीत प्रक्रिया आणि तांत्रिक बाबींवर फील्ड क्षेत्रास प्रशिक्षित करणे आवश्यक आहे. एसएचजींना निरंतर देखरेख आणि मूल्यांकन आवश्यक आहे. एसएचजीच्या सर्व सदस्यांना कागदपत्रे, संप्रषण, निर्णय घेण्याची प्रक्रिया, निर्णयाची अंमलबजावणी इत्यादीच्या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षित केले पाहिजे. एनजीओ त्यांच्या सतत परस्परसंवादामुळे आणि एजन्सीजपेक्षा प्रशिक्षण कार्यक्रम अधिक प्रभावीपणे व्यवस्थापित आणि व्यवस्थापित करू शकतात. ग्रास पातळीवर सहभाग, एमएमआरडीए सारख्या एनजीओने एसएचजी प्रशिक्षण देण्यासाठी काही प्रशिक्षण मॉडयूल तयार केले आहेत.

**३. मोबिलिझिंग सोर्स :** एनजीओ हे वंचित लोकांच्या कल्याणासाठी आवश्यक असलेल्या प्रकल्पांची आणि डिझाइनची ओळख करून देण्यासाठी शक्तीशाली एजन्सी आहेत. ते अंतर्गत आणि बाहय दोन्ही संसाधनांना एकत्रित करतात. अनेक एनजीओच्या अनुभवावरून दिसून येते की ते देशाच्या आणि बाहेरच्या स्त्रियांच्या फायद्यासाठी स्त्रोत व्यवस्थापित करू शकतात.

**४. सुविधा भूमिका :** एनजीओ विविध प्रकारच्या क्रियाकलाप बदलू शकणारे एजंट किंवा उत्प्रेरक म्हणून काम करू शकतात जसे की मायक्रो क्रेडीट, शिक्षण, राजकीय सहभागास प्रोत्साहित करणे इ.

**५. लोकांच्या संघटनांना प्रोत्साहन देणे:** एनजीओएस विशेषत: महिला सशक्तीकरणाच्या दृष्टीने लोकांना प्रोत्साहन देणे ही एक प्रभावी धोरण आहे. स्वयंसेवी संस्थाव्यतिरिक्त एनजीओ महिला मंडळाच्या, युवती मंडळाच्या आणि महिलांच्या पर्याप्त प्रतिनिधीत्वाने ग्राम आधारित समित्यांस प्रोत्साहन देत आहे. स्वयंसेवी संस्था बनवून महिलांना स्वातंत्र्याचा आनंद घेण्यासाठी एनजीओने एक मंच तयार केला आहे.

**साहित्य परिक्षण :–**

1. कोलियर (१९९८):– भारत सरकारच्या १९८० मध्ये मिळालेल्या माहितीनुसार भारतामध्ये स्त्रियांच्या समस्या हया वाढत आहे ज्याचा परिणाम स्त्रियांचे शिक्षण, त्यांचा सहभाग हयावर होते. या समस्यामूळे स्त्री सक्षमीकरणामध्ये अडथळा येते असे नमूद केले आहे.
2. अनंता नारायना (२०१५) :– स्त्री सक्षमीकरणामध्ये एनजीओची भूमिका (विशेष संदर्भ उत्तरप्रदेश) या शोधनिबंधाव्दारे असे निष्कर्ष काढले की, एनजीओ च्या सहभागामुळे स्त्रीयांच्या संपूर्ण विकास झालेला आढळतो तसेच एनजीओ ने राबविलेल्या कार्यामूळे त्यांच्यामध्ये निर्णयक्षमता आर्थिक सक्षमीकरण कार्यकुशलता ई. गुण विकसित झाले.

**अध्ययनाचे उद्देश:–**

संशोधनाकरीता निवडलेल्या विषयाच्या अनेक बाजू व अनेक पैलू असतात त्यापैकी कोणत्या बाजूचा अभ्यास केला जाणार आहे हे अध्ययनाच्या उद्देशाव्दारे स्पष्ट होते. प्रस्तूत अध्ययनाचे उद्देश खालिलप्रमाणे आहे.

१. हिंगणघाट तालूक्यातील ग्रामीण महीलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा आढावा घेणे.

२. ग्रामीण महीला सक्षमीकरणामध्ये एनजीओज तसेच स्वयंसहायता गट यांची भूमिका अभ्यासणे.

**अध्ययनाची गृहीतकृत्ये :–**

संशोधन समस्येच्या दृष्टीने उपयूक्त तथ्य निवडण्याचे कार्य गृहीतकृत्यामूळे होऊ शकते. प्रस्तूत अध्ययनाचे गृहीतकृत्ये खालिलप्रमाणे–

१. हिंगणघाट तालूक्यातील ग्रामीण महीलांचा आर्थिक विकास झालेला आहे.

२. ग्रामीण महीलांच्या आर्थिक तसेच सर्वांगिण सक्षमीकरणामध्ये एनजीओज व एसएनजी महत्वाची भूमिका बजावतात.

**संशोधन आराखडा:–**

प्रस्तूत संशोधनाच्या आराखडयाचे स्वरूप वर्णनात्मक आहे. कारण नमूण्यात येणाऱ्या वर्धा जिल्हयातील हिंगणघाट तालूक्यातील ग्रामीण भागातील स्त्रीयांच्या सक्षमीकरणामध्ये एनजीओज तसेच एसएनजीज ची भूमिका यांचे यथायोग्य वर्णन त्यांच्याकडून मिळालेल्या माहीतीच्या आधारे केले आहे.

**अध्ययनाचे विश्व:–**

प्रस्तूत संशोधनात वर्धा जिल्हयातील हिंगणघाट तालूक्यातील एकूण १३८ गावांपैकी ५ गावांतील महीलांचा समावेश केला आहे. एकूण ५० महीलांची निवड करण्यात आली ज्या स्वयंसहायता गटामध्ये सहभागी आहेत तसेच एनजीओने सहकार्य मिळाले आहे.

**तथ्य संकलन पध्दती व साधने:–**

प्रस्तूत संशोधनाकरीता तथ्य संकलन करण्याकरीता प्राथमिक पध्दतीतील मुलाखत अनुसूचीचा वापर करण्यात आला. तसेच दूय्यम स्त्रोत गोळा करण्यासाठी विविध ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे तज्ञांचे लेख प्रकाशित केलेले अहवाल यांचा उपयोग करण्यात आलेला आहे.

- **एनजीओ तसेच एसएनजी मार्फत राबविलेल्या योजना कार्यक्रमांमध्ये सहभागी स्त्रीयांची माहिती दर्शक सारणी:**

| अ. क्र. | योजना / कार्यक्रम | सहभागी स्त्रीयांची संख्या (५०) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शैक्षणिक कार्यक्रम | ४० | ८० |
| २ | शासकीय कार्यक्रम | ४५ | ९० |
| ३ | स्त्रीयांचा सहभाग वाढविण्यासाठी कार्यक्रम | ५० | १०० |
| ४ | आर्थिक कार्यक्रम | ५० | १०० |
| ५ | ग्रामिण नेतृत्व | ३० | ६० |
| ६ | नविन तंत्रज्ञानाचा वापर | ४५ | ९० |
| ७ | प्रशिक्षण | ४० | ८० |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते. एनजीओ व एसएनजी मार्फत राबविलेल्या कार्यक्रमामध्ये जास्तीत जास्त स्त्रियां सहभागी होतात. ज्यामूळे त्यांचे सर्वांगीण सक्षमीकरण होण्यास मदत होते.

**निष्कर्ष :—**

प्रस्तूत अध्ययनाचे खालीलप्रमाणे निष्कर्ष काढता येतात.

१) हिंगणघाट तालूक्यामध्ये एकूण ९० स्वयंसहागट आहे परंतू कुठेही एनजीओ कार्य करतांना दिसत नाही.

२) या तालूक्यामध्ये एकूण दोन एनजीओ ची नोंदणी आहे त्यांची नावे खालिलप्रमाणे.

अ) निसर्ग सेवा समिती

ब) सद्भावना ग्रामिण विकास संस्था

संशोधनाअंती असे निदर्शनास आले की ग्रामीण महीला सक्षमीकरणासाठी या एनजीओ कुठलेही कार्य करीत नाही.

३) एसएनजी मध्ये एकूण एका गटामध्ये १५.२० सदस्य आहेत.

४) या गटांना नाबार्ड, बँक ई. कडून कर्ज मिळते.

५) ग्रामीण महिलांना आर्थिक रित्या सक्षम करण्याकरीता स्वयंसहायता गट मदत करते.

६) स्वयंसहायता गटाच्या मदतीने ग्रामीण महीलांचे सक्षमीकरण होते असे निदर्शनास येते.

७) परंतू एनजीओ विशेषत: हिंगणघाट या तालूक्यातील गावांमध्ये ग्रामीण महीला सक्षमीकरणामध्ये महत्वाची भूमिका पार पाडत नाही.

**शिफारसी :—**

१) प्रस्तूत संशोधन क्षेत्र फक्त हिंगणघाट तालूक्यातील मोजक्याच ग्रामीण भागामध्ये केले आहे.

२) सक्षमीकरणासाठी एनजीओ नी विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.

३) नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग ग्रामीण भागांमध्ये वाढावा याकरीता प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.

४) ग्रामीण भागात लघूउद्योग सुरू करण्यासाठी सरकारने विशेष कार्यक्रमा मार्फत राबविले पाहिजे.

**संदर्भग्रंथ :—**

1) डॉ. विद्यूत भागवत : सक्षमीकरण आणि व्यवहार महीला सबलीकरण विशेषांक पुणे विद्यापिठ वार्ता.
2) प्रा. वृषाली नागरेपाटील : महीला सबलीकरण वास्तव व व्यथा— महाराष्ट! टाईम्स वृत्तपत्र लेख.
3) प्रा. श्रीमती डॉ. एस आर. चव्हाण : महाराष्ट!तील महीला सक्षमीकरण योजना आणि त्यांची फलश्रृती — Golden Research Thoughts- Volume-6, Nov. 2016.
4) www.shodhganga.com
5) www.ijariie.com
6) M. Kumaran – Roles, Responsibilities and Trends of NGO in Women empowerment.
7) P. Narumugai – Roles of NGOs Towords Women empowerment- Ananta Narayana – Roles of NGOs in Women empowerment with special reference to Uttar Pradesh

❖❖❖❖